# स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी

# राष्ट्रीय सेवा योजना सत्र २०२२-२३

# विशेष शिबीर अहवाल

**प्रस्तावना** :

आर्णी येथील स्व. राजकमलजी भारती कला. वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत असलेल्या दत्तक ग्राम तेंडोळी, तालुका आर्णी, जिल्हा यवतमाळ येथे ०७ दिवसीय विशेष निवासी शिबीर दिनांक १० मार्च २०२३ ते १६ मार्च २०२३ आयोजित आले. या विशेष शिबिराचा अहवाल सादर करीत आहे. शिबिराच्या उद्देशाने तेंडोळी येथील परिसराची पाहणी करण्यात आली. गावातील सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, शाळा मुख्याध्यापक, ग्रामपंचायत सदस्य व इतर गावातील मान्यवरांच्या भेटी घेण्यात आल्या. त्यांना शिबिराची माहिती देण्यात आली.

**शुक्रवार : दिनांक १०-०३-२०२३**

सकाळी ७.०० वाजता शिबिरार्थी तेंडोळी गावात पोहचले. तेंडोळी येथील प्राथमिक शाळेत मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली. शाळेचा परिसर स्वछ करण्यात आला. विद्यार्थाना शिबिराबद्दल उदबोधन करण्यात आले. गावातील मान्यवरांच्या भेटी घेण्यात आल्या व गावातील पाहणी करण्यात आली. शिबिराचे नियोजन करण्यात आले. प्रा. वि. आर. टोकसे यांनी दुपारी २:०० वाजता शिबिराचे उद्धिष्ट व कार्ये याबाबत माहिती दिली. संध्याकाळी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यासोबत चर्चा करून शिबिराच्या कामांची आखणी करण्यात आली.

**शनिवार: दिनांक : ११-०३-२०२३**

सकाळी शिबिरार्थीनी ६:००-७:३० वाजता योगासने व प्रार्थना घेण्यात आली. शिबिरार्थी नाप्रा. चोरडिया सर यांनी योगासने अभ्यास करून घेतला. त्यानंतर चहा, व नास्ता करण्यात आला. उद्धघाटनाच्या दुष्टीने संपुर्ण शाळेची व मुख्य रस्तापासून शाळेपर्यंत स्वछता करून चुनाने दिशादर्शक आखण्यात आले. तसेच गावातला परिसर स्वछ करण्यात आला. दुपारी १२. ३० वाजता शिबिराचे उद्धघाटन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एन. ए. पिस्तूलकर ,उद्धाटक प्रा. प्रा. डॉ. विवेक सिरसकार, रा.स.यो. क्षेत्रीय समन्वयक, यवतमाळ, प्रमुख पाहुणे सौ. सपनाताई राठोड, सरपंच, परसराम राठोड, ग्रा.पं. सदस्य, प्रा.डॉ. एस.व्ही. वानखडे, ग्रंथालय प्रमुख हे होते. दुपारी ३ वाजता डॉ. वि. आर. माहुरे यांचे आधुनिक शेती तंत्र आणि व्यवस्थापन या विषयावर प्रबोधन केले. संध्याकाळी ८ वाजता गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

**रविवार : दिनांक १२-०३-२०२३**

सकाळी शिबिरार्थींनी ६.00- ७.३० वाजता योगासने व प्रार्थना घेण्यात आली. शिबिरार्थी नाप्रा. चोरडिया सर यांनी योगासने अभ्यास करून घेतला. त्यानंतर चहा व नास्ता करण्यात आला. गावामध्ये प्रभातफेरी काढण्यात आली. अंधश्रद्धा निर्मूलन यावर पथनाट्य करण्यात आले. त्यानंतर गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र तेंडोळी येथे साफसफाई करण्यात आली. दुपारी २ वाजता प्रभु शिवेश पांडे यांनी भारतीय अध्यात्म व वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर प्रबोधन केले. दुपारी ३.३० वाजता श्री. विजय ढाले यांनी काव्यातून समाजप्रबोधन या विषयावर मार्गदर्शन केले. संध्याकाळी ८ वाजता महिला बचत गटाशी चर्चा करण्यात आली.

**सोमवार :दिनांक १३-०३-२०२३**

सकाळी शिबिरार्थींनी ६.00- ७.३० वाजता योगासने व प्रार्थना घेण्यात आली. शिबिरार्थी नाप्रा. चोरडिया सर यांनी योगासने अभ्यास करून घेतला. त्यानंतर चहा व नास्ता करण्यात आला. त्यानंतर गावातील संत सेवालाल महाराज मंदिर येथे साफसफाई करण्यात आली. गावामध्ये प्रभातफेरी काढण्यात आली. अंधश्रद्धा निर्मूलन यावर पथनाट्य करण्यात आले.दुपारच्या बौद्धिक सत्रात श्री. पवन पोटदुखे, साहायक मोटर वाहन निरीक्षक, यवतमाळ यांनी रस्ते सुरक्षा व कायदे यावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर श्री. निर्मलचंद तिवारी यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थी यावर मार्गदर्शन केले. संध्याकाळी ८ वाजता श्रीमती वर्षा तलगे. यांनी बाळ आणि माता संगोपन या विषयावर प्रबोधन केले.

**मंगळवार :दिनांक १४-०३-२०२३**

सकाळी शिबिरार्थींनी ६.00- ७.३० वाजता योगासने व प्रार्थना घेण्यात आली. शिबिरार्थी नाप्रा. चोरडिया सर यांनी योगासने अभ्यास करून घेतला. त्यानंतर चहा व नास्ता करण्यात आला. श्रमदानामध्ये तेंडोळी येथील ग्रामपंचायतची स्वच्छता करण्यात आली. गावामध्ये प्रभातफेरी काढण्यात आली. हुंडाबळी यावर पथनाट्य करण्यात आले. दुपारी २.00 वाजता ध्यानसाधना व रेकी यावर सौ वनिता लाखे यांनी मार्गदर्शन केले. दुपारी ३.३० वाजता श्री विशाल शेजव यांनी आजचा युवक आणि आरोग्य या विषयावर प्रबोधन केले.

संध्याकाळी ८ वाजता तंटामुक्ती व हागणदारी मुक्त गाव या विषयावर श्री. परसराम राठोड, ग्रामपंचायत सदस्य यांनी मार्गदर्शन केले.

**बुधवार :दिनांक १५-०३-२०२३**

सकाळी शिबिरार्थांनी ६.00- ७.३० वाजता योगासने व प्रार्थना घेण्यात आली. शिबिरार्थी नाप्रा. चोरडिया सर यांनी योगासने अभ्यास करून घेतला. त्यानंतर चहा व नास्ता करण्यात आला. श्रमदानामध्ये गावातील प्लास्टिक कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट ग्रामपंचायत मार्फत लावण्यात आली. तसेच गावातील विविध पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणची स्वच्छता करण्यात आली.

दुपारच्या बौद्धिक सत्रात श्री विजयकुमार ठेंगेकर, ग्रामसेवक यांनी युवाशक्तीचे ग्रामविकासातील योगदान यावर मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी जल पे चर्चा अंतर्गत पाणी संवर्धन व त्याचे फायदे यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर गांडूळ खत निर्मिती व उपयोगिता या विषयावर डॉ. पी. जे. आवते यांनी मार्गदर्शन केले. संध्याकाळी स्वयंसेवकांचे संस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आले.

**गुरुवार :दिनांक १६-०३-२०२३**

सकाळी शिबिरार्थांनी ६. ००- ७.३० वाजता योगासने व प्रार्थना घेण्यात आली. शिबिरार्थी नाप्रा. चोरडिया सर यांनी योगासने अभ्यास करून घेतला. त्यानंतर चहा व नास्ता करण्यात आला. समारोपाच्या दृष्टीने संपुर्ण शाळेची व मुख्य रस्तापासून शाळेपर्यंत स्वछता करून चुनाने दिशादर्शक आखण्यात आले. तसेच गावातला आजूबाजूचा परिसर स्वछ करण्यात आला. त्यानंतर डॉ. मनीषा शिरसागर यांचे फ्लॉवर डेकोरेशन यावर कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत विविध प्रकारचे कृत्रिम फुल व पुष्पगुच्छ तयार करण्यास शिकवण्यात आले.

दुपारी ३.० वाजता समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. ए. पिस्तूलकर हे होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणुन श्री. डॉ. एस. व्ही. वानखडे, श्री किशोर रावते, गटशिक्षण अधिकारी, आर्णी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून गावच्या सरपंच सौ. सपना राठोड, परशराम राठोड ग्रामपंचायत सदस्य व गावातील गावप्रतिनिधी म्हणून श्री. रामधन पवार हे होते.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे , महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.रुपाली टेकाडे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीककुमार सोनोने यांनी परिश्रम घेतले.